संविधान दिवस" दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी साजरा करण्याबाबत . . . . . .

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः जपुति-२२१७/प्र.क्र. २४६/२९,

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २४ नोव्हेंबर, २०१७

वाचा :

१) शासन परिपत्रक क्र. जपुति-२२१६/प्र.क्र. १३६/२९, दिनांक २७.१२.२०१६

२) सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १९०२२/ ०७/२०१७/एससीडी-सहा, दिनांक १४.११.२०१७

परिपत्रक :-

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २७.१२.२०१६ अन्वये सन २०१७ मध्ये राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती तसेच राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबतचे कार्यक्रम विहित करण्यात आले आहेत. त्यामध्ये "संविधान दिवस" रविवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१७ रोजी साजरी करण्याचे नमूद केले आहे. तथापि, सदर दिवस "रविवार" या सुट्टीच्या दिवशी येत असल्याने "संविधान दिवस" पुढील कामकाजाच्या दिवशी साजरा करण्याच्या सूचना केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने दिनांक १४.११.२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत.

२. त्यानुसार भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन "रविवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१७" ऐवजी "सोमवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७" रोजी करुन "संविधान दिवस" साजरा करण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२४११५६०६७६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Motibuva Gosavi

Digitally signed by Rajendra Motibuva Gosavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd2a72279cedc3291a205c3283d3bbef1d2d9f91c18e6a59c85d4be419537dd6, serialNumber=af4f504ffc6112f80fa959b12bf6c07bc6406d32001865854c42b75a8da2aaea, cn=Rajendra Motibuva Gosavi
Date: 2017.11.24 11:58:23 +05'30'

(रा. मो. गोसावी)
कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
(मा. मंत्री / राज्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह)
३. मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (प्र. सु, र.व का.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,

६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय मुंबई,
७. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई, (कार्यक्रमास प्रसार माध्यमांद्वारे प्रसिद्धी देण्यास्तव)
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व जिल्हाधिकारी,
१०. सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी
११. आयुक्त, सर्व महानगरपालिका,
१२. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई
१३. निवड नस्ती (सामान्य प्रशासन विभाग / कार्यासन २९)